हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., अमरावती, जि. अमरावती या संस्थेचा भूखंड गहाणमुक्त करण्यास मंजूरी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्रमांक :-घबांक -३४२६/ प्र.क्र.१७८/१९स,

हौसिंग सेल, कुशेश मेन्शन, दुसरा मजला, २२ कावसजी पटेल मार्ग,

फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९१/८२०/1 ला/१८-सी, दि.२०.०३.१९९२

२) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९१/८२०/२ रा/१८-सी, दि.०३.०९.१९९३

३) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९१/८२०/३ रा/१८-सी, दि.१३.१२.१९९४

४) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९१/८२०/३ रा/१८-सी, दि.०३.०७.१९९५

५) शासन शुद्धीपत्रक क्र.एचएसजी/ १०९१/ ८२०/१ला/ १८-सी, दि.१७.०८.१९९५

६) हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., अमरावती यांचा दिनांक २८.०१.२०२६ रोजीचा प्रस्ताव व दिनांक ११.०३.२०२६, दिनांक १०.०७.२०२६ रोजीची पत्रे.

७) उप निबंधक, सहकारी संस्था, अमरावती, जि. अमरावती यांचे पत्र जा.क्र.उपनिअम/ वि-२ (२)/हार्दिक गृह./ स्थळ पाहणी अह./ ११४३/२०२६, दिनांक २१.०५.२०२६.

प्रस्तावना :-

राज्य शासकीय कर्मचारी / जिल्हा परिषद कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना आर्थिक मदत या योजनेंतर्गत हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), अमरावती, जि.अमरावती या संस्थेतील एकूण पात्र ४० सभासदांना संदर्भाधिन शासन निर्णय / शासन शुद्धीपत्रक क्र.१,२,३,४ व ५ अन्वये एकूण कर्ज रुपये ३८,७२,५६२/-(रुपये अडतीस लाख बाहत्तर हजार पाचशे बासष्ट फक्त) इतके वितरीत करण्यात आले होते.

हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), अमरावती, जि. अमरावती या संस्थेच्या सर्व ४० सभासदांनी त्यांना वितरीत केलेली कर्जाची रक्कम त्यावरील व्याजासह शासनास परतफेड करून ना-देय प्रमाणपत्र प्राप्त केली आहेत. संस्थेच्या सर्व सभासदांच्या ना-देय प्रमाणपत्रांवरून व या कार्यासनातील खतावणीमधील नोंदीवरुन संस्थेला दिलेले कर्ज व्याजासह वसुल झाल्याचे दिसुन येते. संस्थेकडे शासनाचे येणे बाकी नसल्यामुळे संस्थेचा भूखंड गहाणखतातून मुक्त करण्यासंदर्भात संदर्भ क्रमांक ६ अन्वये संस्थेने सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर बाब विचारात घेऊन शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), अमरावती, जि.अमरावती या संस्थेतील एकूण पात्र ४० सभासदांना वितरीत करण्यात आलेले घरबांधणी कर्ज रुपये ३८,७२,५६२/-(रुपये अडतीस लाख बाहत्तर हजार पाचशे बासष्ट फक्त) त्यावरील व्याजासह शासनास परतफेड केले आहे. सबब, सदर संस्थेकडे शासनाचे कोणतेही येणे बाकी नसल्याने संस्थेने शासनाकडे गहाण ठेवलेला गहाणखतामध्ये नमुद केलेला खालीलप्रमाणे चतु:सीमा असलेला जि.अमरावती, नवसारी येथील सर्व्हे क्रमांक ३२/१फ येथे ८१,७२३.३८ चौरस फूट क्षेत्रफळ असलेला भुखंड व त्यावरील बांधकाम गहाणखतातुन मुक्त करण्यात येत आहे.

पुर्वेस -	खाजगी भूखंड
पश्चिमेस -	सोसायटीचा रस्ता
उत्तरेस -	सोसायटीचा रस्ता
दक्षिणेस -	विद्युत गृह निर्माण संस्था, अमरावती

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०८०६१५५००१६०४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI

Digitally signed by VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=f8392d872b7180812a91876993d519e95c3e41444d8d93ecaac6a9b51c69838f, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C0422C17B24964BFB1F10270074369C4888C02315C6A4C050EAA332B556F90EA, cn=VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
Date: 2026.08.06 15:50:56 +05'30'

(विजया संगशेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई-०१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती).
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य नागपूर-०२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती).
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) संचालक, विमा संचालनालय, मुंबई गृहनिर्माण भवन (म्हाडा) खोली क्र. २६४, पहिला मजला, बांद्रे (पुर्व) ४०० ०५१.
७) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.अमरावती.
९) जिल्हा विशेष, लेखापरिक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, जि.अमरावती.
१०) उप निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे कार्यालय, ता.जि.अमरावती.
११) अध्यक्ष, हार्दिक सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), अमरावती, जि.अमरावती.
१२) निवडनस्ती कार्यासन १९स.